४५७१

जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/ /२०२२

वाहतुक नियंत्रण अधिसुचना दिनांक - १४/११/२०२२

दि.१६/११/२०२२ ते २३/११/२०२२ रोजी पर्यंत श्री क्षेत्र आळंदी येथे कार्तिक यात्रा अनुषंगाने दि.२०/११/२०२२ रोजी कार्तिकी एकादशी तसेच २२/११/२०२२ रोजी संत श्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांचा संजीवन समाधी सोहळयानिमित्त आळंदीमध्ये महाराष्ट्राच्या व देशाच्या कानाकोपऱ्यातुन मोठया प्रमाणात सुमारे ६ ते ७ लाख भाविक लोक संत श्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज (माऊलींच्या) दर्शनासाठी येत असतात त्यामुळे आळंदी येथील माऊली मंदीरातुन दर्शनबारी सुरु होयुन ती देहुफाटा पर्यंत दर्शनबारीत मोठया प्रमाणात भाविकांची गर्दी असते.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी सतिश माने, सहाय्यक पोलीस आयुक्त, वाहतूक अति. कार्यभार पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिंपरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन खालील प्रमाणे तात्पुरते स्वरुपात आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

**दिघी-आळंदी/देहुरोड/तळवडे/चाकण वाहतुक विभाग अंतर्गत**

| अ.क्र | ठिकाण | पर्यायी मार्ग |
|---|---|---|
| १. | मोशी चौक येथुन नगरकडे येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद | १. जयगणेश साम्राज्य चौक, अलंकापुरमचौक मार्गे<br>२. भोसरी आळदी रोडने मॅगझीनचौक मार्गे<br>३. मोशी-चाकण ते शिक्रापुर मार्गे |
| २. | भारतमाता चौक, मोशी येथुन नगरकडे येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद | १. जयगणेश साम्राज्य चौक, अलंकापुरमचौक मार्गे<br>२. भोसरी आळदी रोडने मॅगझीनचौक मार्गे<br>३. मोशी-चाकण ते शिक्रापुर मार्गे |
| ३. | चिंबळीफाटा चौक, चाकण येथुन नगरकडे येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद | १. जयगणेश साम्राज्य चौक, अलंकापुरम चौक मार्गे<br>२. भोसरी आळदी रोडने दिघी मॅगझीन मार्गे |
| ४. | आळंदी फाटा चौक, चाकण येथुन आळंदीकडे येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद | १. जयगणेश साम्राज्य चौक, अलंकापुरम चौक मार्गे<br>२. भोसरी आळदी रोडने मॅगझीनचौक मार्गे |
| ५. | चाकण-वडगांव घेणंद मार्गे आळंदीकडे येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद | १. कोयाळी कमान, कोयाळी- मरकळगाव मार्गे |
| ६. | पुंणे-दिघी मॅगझीन चौकाकडुन आळंदीकडे येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद | १. भोसरी आळंदी रोडने इच्छित स्थळी,<br>२. अलंकापुरम-जयगणेश साम्राज्य चौक मार्गे |
| ७. | मरकळकडुन धानोरेफाट्या मार्गे | धानोरेफाटा - चऱ्होली फाटा- मॅगझीन चौक |

| | | |
|---|---|---|
| | आळंदीकडे येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद | /अलंकापुरम चौक मार्गे |
| ८. | पुण्याकडुन आळंदीकडे जाणारी वाहनांना काळे कॉलनी तापकीर चौक चऱ्होली फाटा यापुढे जाण्यास प्रवेश बंद | |
| ९ | देहु कमान (जुना मुंबई पुणे हायवे) येथुन देहुगाव कडे येणाऱ्या वाहनांना प्रवेश बंद | भक्ती शक्ती चौक ते त्रिवेणीनगर मार्गे खंडेलवाल चौक ते देहुगाव |

तरी वरील प्रमाणे दि.१६/११/२०२२ रोजी ०९.०० वा ते दि.२३/११/२०२२ रोजी १६.०० वा पर्यंत आळंदीकडे जाणाऱ्या वाहनांना (दिंडीतील वाहने व अत्यावश्यक सेवेची वाहने वगळुन) प्रवेश बंदी करण्यात आलेली असुन त्याप्रमाणे वाहतूकीत बदल केलेबाबत आदेश (नोटीफिकेशन) करण्यात येत आहे.

<u>जड वाहनांना प्रवेश बंदी</u>

| अ.क्र | ठिकाण | पर्यायी मार्ग |
|---|---|---|
| २ | तळेगाव चाकण रोडवरील देहुफाटा येथुन देहुगाव कडे येणाऱ्या जड वाहनांना प्रवेश बंदी | चाकण तळेगाव रोडवरील एच पी चौक मार्गे इच्छित स्थळी |
| ३. | महिंद्रा सर्कल कडुन आय टी पार्क /कॅनवे चौक येथे येणाऱ्या जड वाहनांना प्रवेश बंदी | महिंद्रा सर्कल कडुन निघोजे ते मोई फाटा मार्गे इच्छित स्थळी |

तरी वरील प्रमाणे दि.१८/११/२०२२ रोजी १२.०० वा ते दि.२१/११/२०२२ रोजी १९.०० वा पर्यंत देहुकडे जाणाऱ्या सर्व जड वाहनांना (दिंडीतील वाहने व अत्यावश्यक सेवेची वाहने वगळुन) प्रवेश बंदी करण्यात आलेली असुन त्याप्रमाणे वाहतूकीत बदल केलेबाबत आदेश (नोटीफिकेशन) करण्यात येत आहे.

(सतिश माने)
सहाय्यक पोलीस आयुक्त, वाहतूक
पोलीस उप आयुक्त,वाहतूक,पिंपरी चिंचवड (अति.कार्य)

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :

१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर

२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.

३) प्रभारी अधिकारी <u>संबंधीत</u> वाहतुक विभाग

४) आळंदी नगरपरिषद, आळंदी

/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.